# बालरंगभूमीसाठी कोणीतरी झटण्याची गरज - लालन सारंग

***व्यावसायिक,*** प्रायोगिक अशा रंगभूमीसाठी अनेकजण काम करीत आहेत. त्यामुळे मराठी रंगभूमी समृद्ध झाली आहे. परंतु, रंगभूमीचा पाया असणाऱ्या बालरंगभूमीसाठी आजही कोणीतरी झटायला पाहिजे, असे आवाहन करतानाच बालरंगभूमी समृद्ध झाली, तर मराठी नाटकांना सोन्याचे दिवस येतील, असे मत ज्येष्ठ रंगकर्मी लालन सारंग यांनी केले. माधवी प्रकाशनतर्फे डॉ. वि. भा. देशपांडे लिखित 'नाट्यभ्रमणगाथा' या पुस्तकाचे लालन सारंग यांच्या हस्ते प्रकाशन झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. प्रकाशक रवींद्र जोशी, चंद्रशेखर जोशी, नंदू कुलकर्णी यावेळी उपस्थित होते. 'बुकगंगा डॉट कॉम'तर्फे यावेळी ई-बुक स्वरूपातही पुस्तकाचे प्रकाशन झाले. विनया देसाई यांनी सूत्रसंचालन केले. चंद्रशेखर जोशी यांनी प्रास्ताविक केले.

